


साप्ताहिक

# डोंगरचा राजा

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

संपादक : अनिल वाघमारे




■ वर्ष ११ ■ अंक ११ ■ गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

# दादा-भैय्यांचे नेतृत्व आमच्यासाठी सर्वस्व

## वडवणी नगराध्यक्षपदाची निवडणूक लढविणार:नगरसेवक नागेश डिगे





**डोंगरचा राजा विशेष वृत्त..**

कॉलेज जीवनामध्ये एआयएसएफच्या माध्यमातून कॉम्रेड कै.आसारामजी ढोले यांच्या नेतृत्वाखाली काम करत आल्याने तळागाळातील जनमानसांच्या अडीअडचणींना वाचा फोडण्याचे बळ मिळाले. जनतेसाठी आम्ही काम करत असताना १३ ते १४ गुन्हे आमच्यावर दाखल करण्यात आले होते. त्यावेळी आम्ही १९ दिवस जेल देखील भोगले. आणि दोन वर्ष हद्दपार राहावे लागले. हे केवळ शहर विकासाच्या संदर्भात घडलेल्या घडामोडीमुळे आम्ही ही जोखीम पत्करली होती. खरंतर तेव्हापासूनच आम्ही राजकारणही शिकलो आणि ग्रामपंचायत सदस्य ते नगरसेवक पदापर्यंत पोहोचलो. आता आम्ही फक्त आणि फक्त माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांचे नेतृत्व आमच्यासाठी सर्वस्व आहे. त्यांच्या आदेशानुसारच आम्ही गत पाच वर्षात नगरसेवक पदाला अनुसरून जनतेची सेवा करत आलो आहोत. यापुढेही करत राहू आणि त्यांचा आदेशाने आपण ओबीसीसाठी सुटलेल्या आगामी काळातील नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत सर्वस्व पणाला लाऊ असं रोखठोक मत नगरसेवक नागेश डिगे यांनी व्यक्त केले.




पुढे बोलताना ते म्हणाले की, आम्ही २००१ पासून शिवसेनेत काम करण्यासाठी सक्रिय झालो. २००२ मध्ये शिवसेना पक्षाचे शहराध्यक्ष म्हणून आम्ही काम केले. शिवसेनेचे काम करत असताना पाच वर्ष ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच पद देखील भोगले. मात्र २०१४ ते २०१९ या पंचवार्षिक मध्ये आमचा अल्पशा मताने पराभव झाला. त्यावेळी आम्ही या निवडणुकीत १७ पैकी १३ जागांवर शिवसेना पक्षाचे उमेदवार उभे केले. त्यात एक उमेदवार कचरू जाधव यांना विजयी करण्यात आमचा सिंहाचा वाटा होता.

२०२१ मध्ये आम्ही नगरपंचायत च्या निवडणुकीत विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीत विजयी झालो. आम्हाला पत्नी सौ.नागेश डीगे यांच्यावर नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण सभापती पदाची जबाबदारी दिली गेली. आम्हाला आमचे नेतृत्व आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांनी संधी दिली. या कार्यकाळामध्ये आम्ही प्रामुख्याने शहरातील नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याबरोबरच सामाजिक, धार्मिक,शैक्षणिक उपक्रमातही सहभाग घेतला. त्याचबरोबर शहर विकासाच्या कामकाजात सर्वांना सोबत घेऊन वार्ड क्रमांक १६ मध्ये या पंचवार्षिक मध्ये आमच्या कार्यकाळात आमच्या वार्डामध्ये सिमेंट रस्ते, अंडरग्राऊंड नाल्या, पाणी पुरवठा सह सर्व सुख सुविधा उपलब्ध करून नागरिकांची सेवा केली.

आम्ही सर्व जाती धर्मांच्या नागरिकांसोबत सलोख्याचे संबंध जोपासण्याचे काम केले आहे. करत आहोत. करत राहू. त्याचबरोबर शहर विकासाच्या अनुषंगाने विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके तसेच युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांच्या आदेशानुसार यापुढेही काम करत राहणार आहोत. खरंतर आगामी नगरपंचायत च्या निवडणुकी संदर्भात नुकताच नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर झाली आहे. ओबीसी महिला या प्रवर्गासाठी हे नगराध्यक्ष पद आरक्षित झाले आहे. त्यामुळे आमच्या पत्नी नगरसेविका सौ.. नागेश डिगे या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकी साठी सज्ज झालेल्या आहेत.

आम्ही आजवर केलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने जनतेपर्यंत जाऊन त्यांचा मतदानरुपी आशीर्वाद घेण्यास निश्चितच यशस्वी राहणार आहोत. आम्हाला विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांचे नेतृत्व आता मिळाले असुन मागील पाच वर्षांपासून जनहिताचे कामं करण्यासाठी बळ मिळाले आहे. त्यामुळेच त्यांच्या आदेशानुसारच व नेतृत्वाखाली आम्ही आगामी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविणार असल्याचे मत देखील विद्यमान नगरसेवक नागेश डिगे यांनी व्यक्त केले.

# जाहिर प्रगटनाचे उत्तर

दि.०३/१०/२०२५

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे उत्तर येते की, जाहीर प्रगटन देणार यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरून व दिलेल्या माहिती वरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, दिनांक ३०/ ०९/ २०२५ रोजी दैनिक पार्श्वभूमी वर्तमानपत्रात मा. तहसीलदार साहेब वडवणी यांनी जाहीर प्रगटन दिलेले होते, त्या जाहीर प्रगटनामुळे मोजे शिवार वडवणी येथील गट क्र. ६५८ मधील जमीन धारक व ताबेदार व सदर गटातील गाळया मधील भाडेकरू यांना नाहक त्रास होत आहे, मा. माजलगाव येथील व. स्तर दिवाणी न्यायालयाने गट क्र. ६५८ मधील हमीद अमिन कुरेशी व ईतर यांच्या मालकी व ताब्यातील ५९ गुंठे जमिनीला ज्याची चर्तु:सिमा:- पुर्वेस -दक्षिणेत्तर वाहतुकीचा सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस-फिरोज बी महमदहुसेन कुरेशी यांची जमीन व त्यानंतर ओढा, दक्षिणेस-गट क्र. ६५८ मधील शासकीय गायरान, उत्तरेस-ओढा या चर्तु: सीमेच्या आतील व वर्णनाच्या जमिनीला रे. दि. दा. क्र.३६/२०२५ मध्ये तूर्तास मनाई हुकुम दिलेला आहे. सदर रे. दि.दा. क्र.३६/२०२५ मध्ये शासकीय कार्यालय हे प्रतिवादी म्हणून पार्टी आहेत. तरी सर्व जनतेस कळवण्यात येते की, मौजे शिवार वडवणी येथील गट क्र. ६५८ मधील ५९ गुंठे जमिनीला व त्यामधील तदंगभूत वस्तुसह मा.माजलगाव येथील न्यायालयाने मनाई हुकूम दिलेला असल्यामुळे गट क्र.६५८ मधील असणाऱ्या मिळकत विरुद्ध कोणतीही कार्यवाही होणार नाही, जर शासकीय कार्यालयामार्फत गट क्र. ६५८ मधील जाहीर प्रगटन देणार यांच्या मालकी व ताब्यातील जमिनीला हरकत अडथळा करण्यात आला अथवा कोणत्याही प्रकारचा कारवाई करण्यात आली तर मा. व. स्तर माजलगाव न्यायालय यांनी दिलेल्या रे.दि.दा. क्र.३६/२०२५ मधील मनाई हुकमाचा भंग केला असे समजण्यात येईल व त्या आदेशाचा अवमान केला असे समजून सदर शासकीय कार्यालया विरुद्ध अवमानाची कार्यवाही व आदेशाच्या भंगाची कार्यवाही दाखल करण्यात येईल, तसेच गट क्र. ६५८ बाबत मा. माजलगाव न्यायालयामध्ये व मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे प्रकरण अद्याप प्रलंबित आहेत, त्यामुळे गट क्रमांक ६५८ बाबत शासकीय कार्यालया मार्फत कोणतीही कार्यवाही करणे म्हणजे रे. दि. दा.नं.३६/२०२५ मधील मनाई हुकूमाच्या आदेशाचा भंग करणे असे समजण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,

जाहीर प्रगटन उत्तर देणार

**हमीद अमिन कुरेशी**

रा. कुरेशी गल्ली,वडवणी.

ता.वडवणी जि.बीड

-- मार्फत--

**ॲड.एन. आर. लंगडे**

वडवणी. मो. नं. ९८६०९७१८१८

## संपादकीय

# बिहारी धुमाकूळ

मतदार याद्यांच्या सखोल पडताळणी मोहिमेमुळे चर्चेत असलेल्या बिहारच्या विधानसभा निवडणुकीचा मुहूर्त अखेर जाहीर झाला आहे. जातीय समीकरणे, थेट लाभाच्या योजना, मतविभागणीचे डावपेच आणि प्रस्थापितांच्या विरोधातील असंतोष असे अनेक पैलू असलेल्या या निवडणुकीत कोणता घटक निर्णायक ठरणार, याचा कौल ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदार करतील आणि १४ नोव्हेंबर रोजी तो सर्वांना कळेल. गेली वीस वर्षे वेगवेगळ्या आघाड्यांबरोबर सत्तासोबत करणारे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि त्यांना आव्हान देणारे नव्या पिढीचे शिलेदार तेजस्वी यादव हे यंदाच्या विधानसभा लढतीतील प्रमुख नायक; लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, जनसुराज्य पक्षाचे नेते प्रशांत किशोर, लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पास्वान, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्यासह कन्हय्या कुमार, जीतनराम मांझी असे अनेक नेते या लढतीची रंगत वाढवणार, अशी सध्याची स्थिती आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणेच यंदाही बिहारमध्ये 'काँटे की टक्कर' होणार, यावर निवडणूक पंडितांचे एकमत असले, तरी जन्मत:च राजकारणाचे बाळकडू घेऊन आलेला चाणाक्ष बिहारी मतदार यंदाही त्यांचे अंदाज चुकवणार का, याचीच उत्सुकता आहे.

निवडणूक आयोगाने तारखांची घोषणा केल्यामुळे या लढाईला अधिकृत तोंड फुटले असले, तरी गेल्या काही महिन्यांपासूनच राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महागटबंधन यांच्यात खणाखणी सुरू झाली आहे. यामध्ये दोन्ही बाजूंकडून राजकारणाच्या चित्रात नवनवे रंग भरण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गेला काही काळ बिहारमध्ये जनतेचा मोठा पाठिंबा असलेल्या जातीय जनगणनेच्या मागणीला केंद्राने हिरवा कंदील दाखवला आहे. त्यानंतर बिहारमधील मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीची निवडणूक आयोगाची मोहीम (एसआयआर) वादाच्या भोवऱ्यात सापडली. हा झगडा सर्वोच्च न्यायालयातही पोहोचला आहे. त्यात आधार कार्ड पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याचा आदेश न्यायालयाने दिला असला, तरी अंतिम निर्णय आलेला नाही. या मोहिमेत ४७ लाख मतदारांची नावे वगळली गेली.

निवडणूक आयोगाच्या कारभाराच्या विरोधात राहुल गांधी यांनी 'व्होटचोरी' चा आरोप करून बिहारमध्ये 'व्होटर अधिकार यात्रा' काढली; तिला मोठा प्रतिसाद मिळाला. याचा मतदारांवर परिणाम होणार, असे वाटत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी महिलांना दहा हजार रुपये देण्याचा हुकमी एक्का बाहेर काढला आहे. बिहारच्या साडेसात कोटी मतदारांमध्ये ४६ टक्के महिला आहेत. त्यांपैकी एक कोटींहून अधिक महिलांनी या योजनेत अर्ज केले असून, बहुतांश महिलांच्या खात्यात रकमा जमाही झाल्या आहेत. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये सत्ताधाऱ्यांना हुकमी यश मिळवून देणारी ही ओवाळणी बिहारमध्येही 'एनडीए' ला पुन्हा विजयाची माळ घालणार का, हे निकालानंतर कळेल.

दुसरीकडे, अनेक जनमत चाचण्यांमध्ये तेजस्वी यादव यांनी मुख्यमंत्रिपदाचा सर्वांत लोकप्रिय चेहेरा म्हणून आघाडी घेतल्याचे दिसते; तसेच बेरोजगारीसारख्या मुद्द्यावरून ते सातत्याने रान उठवत आहेत. मुस्लिम आणि यादव यांचे 'एमवाय' समीकरण, ही विरोधकांची जमेची बाजू असून, प्रस्थापितविरोधी मतांची त्यांना साथ मिळाल्यास सत्ताबदल होऊ शकतो, अशी त्यांना आशा आहे.

मात्र, पूर्वीच्या 'जंगल राज'च्या आरोपांमधून त्यांना सुटका करून घ्यावी लागणार आहे. त्याचप्रमाणे मुस्लिम आणि यादवांच्या मतपेढीत 'अतिपिछडे' आणि दलितांच्या मतांचीही जोड देण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे. याच जनमत चाचण्यांमध्ये नितीशकुमार यांना तिसऱ्या क्रमांकावर ढकलून दुसरे स्थान मिळवणारे पूर्वीचे 'निवडणूक पंडित' आणि राहुल यांच्यानंतरचे बिहारमधले दुसरे राजकीय 'यात्रेकरू' प्रशांत किशोर यांनी दोन्ही आघाड्यांची झोप उडवली आहे. ते सत्ताधाऱ्यांना फटका देणार, की प्रस्थापित विरोधी मतांत वाटेकरी होणार, याबद्दल मतभिन्नता आहे; परंतु त्यांचा पाठिंबा मतांमध्ये रूपांतरित होणार का आणि 'किंगमेकर' ठरण्याइतपत आमदार त्यांच्या गाठीशी असणार का, हासुद्धा प्रश्न अनुत्तरित आहे.

नितीशकुमार यांनी बिहारमध्ये 'सुशासन बाबू' म्हणून लौकिक मिळवला असला, तरी गेल्या काही काळात सरकारी पायाभूत सुविधांचे प्रकल्प वगळता औद्योगिक आघाडीवर आणि रोजगार निर्मितीमध्ये बिहारची पीछेहाटच झाली आहे. गेली दोन दशके १८० अंशाच्या कोनात विचारसरण्यांचे झोके घेऊन नितीशकुमार यांनी सत्ता कायम राखली खरी; पण गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या विचित्र वागण्यातून त्यांचे वाढते वय बोलू लागले आहे. त्यामुळेच सरकार कोणाचेही आले, तरी ही निवडणूक म्हणजे लालूप्रसाद यादव आणि नितीशकुमार यांच्या पिढीच्या राजकीय अस्ताची आणि तेजस्वी, चिराग, सम्राट चौधरी यांच्या पिढीच्या उदयाची ठरणार, हे मात्र स्पष्ट आहे.

# मी मराठी.. माझी मराठी

लाभले भाग्य आम्हा बोलतो मराठी.. हो मराठी भाषकांचं राज्य आणि त्यातली भाषा मराठी' अणि त्याला मिळालेला अभिजात दर्जा या सा-यांचा आपल्यातील प्रत्येकाला अभिमान आहे आणि आता याचा अधिक उत्कर्ष व्हावा यासाठी शासनस्तरांवर देखील मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे.

मुंबई-पुणे सारख्या शहरात शिकलेली मुले ही ग्रामीण भागात शिकलेल्या मुलांपेक्षा सरस ठरतात असं नाही परंतु आपलाकडे इंग्रजीचं जास्त कौतुक झालं आणि इंग्रजी बोलण्यात मेट्रो शहरातील मुले अग्रेसर असल्याने ग्रामीण महाराष्ट्रातील मुलांमध्ये न्यूनगंड अधिक आहे. आणि हाच दूर करण्याचे काम प्राधान्याने मराठीचा वापर वाढविल्याने होणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतला जाणाऱ्या भारतीय प्रशासन सेवा अर्थात आयएएस मध्ये देखील मराठी माध्यमाचा समावेश करण्यात आला आहे. आपण ती परिक्षा तसेच मुलाखत यासाठी मराठी भाषेचा पर्याय निवडावा हे उत्तम.

नाना पाटेकरचं एक वाक्य आहे.

मला स्वप्न मराठीत पडतात तर मराठीच जवळची त्याप्रमाणे आपली मातृभाषा आपण सर्वत्र वापरावी यातून आपला आत्मविश्वास वाढीला लागेल आणि आपण कोणत्याही क्षेत्रात बाजी मारू शकतो याचीही खात्री बाळगता येईल.

अमृतातेही पैजा जिंके अशी आपली मराठी काळानारुप बदलत आली आहे. इंग्रजीचं कौतूक करणारे देखील कबूल करतील की ऑक्सफर्ड आपल्या शब्दकोषात इतर भाषेचे शब्द स्विकारतो त्यावेळी त्यात मराठीला प्राधान्य आहे. आणि मराठीचे मोठेपण असे की आपणही इतर भाषेतील शब्द मोठया प्रमाणात स्विकारतो अहे की आपणही इतर भाषेतील शब्द मोठ्या प्रमाणात स्विकारतो आणि त्याचा वापर करतो. याने उत्क्रांत होणारी मराठी भाषा दिवसेंदिवस अधिक संपन्न होत आहे.

समाजमाध्यमांमध्ये देखील आज मराठीचा सर्वाधिक वापर होतो याचा आपणास अभिमान हवा आणि इंग्रजी शब्दात मराठीचं वेगळेपण मान्य आपल्यातील प्रत्येकाने याचा वापर वाढवला तर मराठीचा प्रचार वेगाने होईल.

प्रशांत दैठणकर
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

# वडवणी सरपंच संघटनेच्या निवडी जाहीर अध्यक्षपदी माधव शेंडगे



वडवणीः प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात सरपंच संघटनेच्या निवडी नुकत्याच जाहीर करण्यात आले आहेत या निवडी बिनविरोध पार पाडल्या असून यामध्ये अध्यक्षपदी माधव शेंडगे,तर उपाध्यक्षपदी मयूर आंधळे, गणेश आंबुरे व सचिवपदी संजय धपाटे यासह इतर सदस्यांच्या निवडी झाल्या आहेत.वडवणी तालुका सरपंच संघटनेच्या पदाधिकारी निवडीसाठी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन दोन दिवसापूर्वी वडवणी येथे करण्यात आले होते. या बैठकीला तालुक्यातील सर्वच गावचे सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवडी मुळे सरपंचांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तसेच शासन दरबारी सरपंचांचे म्हणणे मांडण्यासाठी या निवडीच्या माध्यमातून नवीन पदाधिकारी काम करणार आहेत. या निवडी तालुक्यात मर्यादित आहेत या निवडीमध्ये सर्वानुमते सरपंच संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी परडी माटेगावचे सरपंच माधव शेंडगे तर उपाध्यक्षपदी रुई गावचे विकासाभिमुख सरपंच मयूर आंधळे तसेच खळवट लिमगावचे सरपंच गणेश अंबुरे व सचिव पदी केंडेपिंपरी धानोरा गावचे सरपंच संजय धपाटे यासह सदस्य यांच्या ही बिनविरोध निवडी करण्यात आल्या आहेत तरी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# शेतकऱ्यांसाठी साठ हजार कोटीच पॅकेज द्या

माजलगाव :प्रतिनिधी

साडेचार कोटी जनतेला जगण्यासाठी साठ हजार कोटीच पॅकेज द्या,राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, अर्थमंत्र्याकडे अखिल भारतीय मराठा महासंघ किसान आघाडीची याचना,असे अखिल भारतीय मराठा महासंघ किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष सखाराम नाईकनवरे (भाऊ)यांनी प्रसिध्दीपत्रकाच्या निवेदनाद्वारे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, अर्थमंत्री निर्मला सितारामन यांच्याकडे निवेदनाद्वारे याचना केली आहे.

प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, मराठवाड्यातील साडेचार कोटी जनता मागासलेली असून त्या दुःखात आणखी एक भर नैसर्गिक आपत्तीच्या अवकृपेमुळे पुराच्या तडाख्यामुळे ४० लाख हेक्टर जमीनीतील पिके उध्वस्त झाली आहेत. त्यामध्ये जुन ते सप्टेंबर२०२५पर्यंत ८५० शेतकरी आत्महत्या करुन मेले आहेत. तर १०४ माणसे महिला,पुरुष वाहून गेले आहेत.त्यामध्ये ३००० जनावरे मृत्युमुखी पडले, १००० घरे पावसाच्या अतिवृष्टीमुळे पडलेले आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील ८ लोकसभा, ४६ विधानसभा ८८ तालुक्यांचा समावेश झालेला आहे.त्यांना जगण्यासाठी व मराठवाड्यातील मागासलेला अनुशेष भरण्यासाठी ईतर राज्यात ज्या प्रमाणे निधी दिला जातो. त्याच प्रमाणे मराठवाड्याला ६० हजार

कोटीचे पॅकेज देवुन मागासलेल्या मराठवाड्याचा अनुशेष भरुन काढावा, असे प्रसिध्दीपत्रकाच्या निवेदनाद्वारे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी,अर्थमंत्री निर्मला सितारामन यांच्याकडे प्रसिध्दी पत्रकाच्या निवेदनाद्वारे याचना (मागणी) केलेली आहे,असे अखिल भारतीय मराठा महासंघ किसान आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष सखाराम नाईकनवरे, किसनराव घाटुळ,सोपान थावरे,भागवत कदम साळेगावकर,राजेभाऊ नाईकनवरे, अनंत नाईकनवरे,अंगद नाईकवाडे, भारत माने,बाबासाहेब शिंदे, उध्दव शेंडगे, धोंडीराम नाईकनवरे,लक्ष्मण नाईकनवरे, बंडु नाईकवाडे,महादेव लांडे, बळीराम शिनगारे,मसुदेव जगदाळे,लक्ष्मण भागवत,मच्छिंद्र शिंदे,विक्रम शेंडगे ईत्यादींनी प्रसिध्दीपत्रकाच्या निवेदनाद्वारे नमुद करण्यात आले आहे.

# शेतकऱ्याच्या दुष्काळी मागण्यासाठी एकट्या वाघाने केला रस्ता रोको

माजलगाव :प्रतिनीधी

शेतकऱ्याच्या दुष्काळी मागण्यासाठी एकट्या वाघाने केला रस्ता रोको.तो वाघ म्हणजे श्रीराम कोरडे,फुले पिंपळगाव येथील शेतकरीपुत्र दि.३ऑक्टोबर२०२५ रोजी नॅशनल हायवे (६१) महात्मा फुले चौक, फुलेपिंपळगाव- केसापुरी कॅम्प माजलगाव या ठिकाणी झाला. शेतकरीपुत्र श्रीराम कोरडे यांचेकडे बॅनर बनवण्यासाठी देखील पैसे नव्हते,परंतु दिलेल्या निवेदन व त्याप्रमाणे आंदोलन करायचेच असा मनस्वी ठरवलेले आंदोलन पुर्ण केले.




शेतकरी माय -बापाच्या दुष्काळाने होरपाळुन निघालेल्या सहकार्याच्या भावनेतून मदतीची हाक देणारे,त्यांची व्यथा मांडण्यासाठी विविध शेतकरी मागण्या साठी रास्तारोको करणारे शेतकरी पुत्राची लाज इज्जत ठेवली.कारण हे आंदोलन हे शेतकऱ्यासाठी असूनही एकही शेतकरी येथे आला नाही.शेतकरी मायबापाच्या व्यथा,आक्रोश, किंकाळे बधीर,डोळे बंद करून बसलेल्या सरकारपर्यंत जातंय का नाही हाच प्रश्न या शेतकरीपुत्रा समोर आहे.

जगाच्या पोशिंद्याने त्याच्याच लेकरा-बाळांना कुटुंबांना कसे जगायचे हा प्रश्न त्याच्यापुढे पडला आहे.त्यामुळे त्याच्यापुढे आत्महत्या करण्यासारखे संकट निर्माण झाले आहे. तरी देखील केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही सरकारने गेंड्याची कातडी परिधान करून कुंभकर्ण झोपेचे सोंग करतोय कि काय असा प्रश्न या शेतकरीपुत्राला नक्कीच पडला असेल.असे जर होत असेल तर शेतकरी पुत्र कोणत्याही ''आजी-माजी लोक प्रतिनिधींना गावबंदी करण्यात येईल''.तरी देखील मागण्या मान्य,मंजूर,पूर्ण झाल्या नाही तर त्यांना त्यांच्या निवासस्थानी स्थानबद्ध,बंद करण्यात येईल.त्यानंतरही मागण्या मान्य झाल्या नाही तर महाराष्ट्राचे मंत्रालय,मुंबई बंदी करण्यात येईल. याची या सरकारीबाबुनी दखल घेऊन ही व्यथा मांडण्याची तसदी घ्यावी.अशी व्यथा ''शेतकऱ्याचा पुत्र''शेतकऱ्याचा वाघ या अधिकाराने देत आहे. कारण जे तुमच्या ताटात असते ते माझ्या शेतकरी माय - बापाचे रक्तातून घामातून आणि कष्टातून आलेले आहे. याची जाणीव,आठवण असू अथवा खाल्ल मिठाला बेईमान होतो त्याच्या माती झाल्याशिवाय राहत नाही.या खुर्चीत बसलेल्या आमदार, खासदार,मंत्री यांनी लक्षात असू द्या,कारण माती आमची माय आहे.तरीदेखील आपल्या मातीचा व शेतकरी बापाचा विचार करून आपण आमच्या मागण्या मान्य मंजूर पूर्ण करावे.अशी आर्त टाहो या आंदोलन कर्त्याने केला आहे.

या आंदोलनातील मागण्या पुढीलप्रमाणे -केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी विशेष अधिवेशन बोलून ओला दुष्काळ जाहीर करून सरसगट हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे, शेतमजूर कामगार व संबंधित सर्व मजूर यांना पन्नास हजार रुपये मानधन देण्यात यावे, शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्च + नफा यानुसार हमीभाव देण्यात यावा,

ज्या ठिकाणी रस्ते व पूल पाण्याखाली गेले आहेत त्यांची उंची वाढवून गरज भासल्यास त्या ठिकाणी नवीन पुल तयार करण्यात यावे तसेच अनेक ठिकाणी पांदन रस्ते व शेतरस्ते मंजूर देण्यात यावी. पावसाळ्यामुळे अथवा अन्य कारणामुळे शेतकऱ्यांचे व शेतमजुराचे नुकसान झाले आहे.त्यांना मदत पॅकेज दिले जावे. या मागण्या मान्य जर केल्या नाहीत तर शेतकरी यांनी उत्पादित केलेला माल,धान्य भाजीपाला,दूध व अन्य कोणती वस्तूमाल बाजारात मार्केटला जाणार नाही व तसेच बाहेर देशातून राज्यातून आयात केला जाऊ देणार नाही,जोपर्यंत मागण्या मंजूर पूर्ण होत नाही तोपर्यंत.असा इशारा संबंधित सर्व प्रशासनाला या आंदोलन कर्ते शेतकरीपुत्र श्रीराम कोरडे यांनी दिला आहे.

# धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा

माजलगावःप्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन ६९वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला सकाळी ठिक ९.००वा माजलगाव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकानी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन धम्मरॅली स सुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते रॅलीचा समारोप करुन पुज्य भन्ते धम्मप्रिय थेरो चैत्यभूमी दादर मुंबई यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे पर्यटन सचिव के व्ही साळवे सर हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा संस्कार उपाध्यक्ष लिलाताई उजगरे,जिल्हा महिला संस्कार सचिव आशा ताई मोरे ,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,महिला जिल्हा संघटक शोभाताई भोजने, जिल्हा संघटक बी सी डोंगरे ,महिला तालुका अध्यक्ष मंदाताई साळवे,शेलापुरीच्या उपसरपंच शुशिलाताई घडसे यांच्या सह धम्म उपासक -उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के यांनी केले सुत्रसंचलन वंदनाताई घनघाव यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ,नाथाजी घडसे ,किसन भदरगे,नितिन डोंगरे यांनी परिश्रम घेतले.



रामायण हे महाकाव्य रचणारे आद्यकवी, तत्वज्ञानी महर्षी वाल्मिकी यांना जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे अभिवादन केले. यावेळी उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी नगरसेवक शिवाजी टकले सह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ.विलास फरताडे यांचा सत्कार

वडवणीःप्रतिनिधी

वडवणी येथील रहिवासी असणारे व सध्या गोवा राज्यामध्ये समुद्र विज्ञान संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले डॉ.विलास भागवत फरताडे यांना नुकतीच चीन सरकारच्या चायनीज अकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्याकडून प्रतिष्ठित पोस्ट डॉक्टराल फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या पुढील संशोधनासाठी त्यांची दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अशाप्रकारे सर्वोच्च यश गाठणारे डॉ.विलास फरताडे हे बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील एकमेव असावेत. त्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीबध्दल त्यांचा सोमवारी वडवणी येथे मित्र परिवाराच्या वतीने गौरव सत्कार करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

डॉ.विलास फरताडे यांना नुकतीच गोव्याच्या सीएसआयआर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी येथून डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्था ही आशियातील एक अग्रगण्य सागरी संशोधन संस्था आहे. येथे आधुनिक प्रयोगशाळा प्रवाळ संवर्धनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि बहूविषयक संशोधन सुविधा उपलब्ध आहेत. डॉ.विलास फरताडे यांच्या या यशाबध्दल त्यांचे दि.६ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी स्वस्तिक ज्वेलर्स याठिकाणी मित्र परिवार यांच्या वतीने गौरव सत्कार करण्यात आला.

# ११ ऑक्टोबर रोजी पत्रकारांचे एसएमएस पाठवा आंदोलन

मुंबई:म.नेता

पत्रकार संरक्षण कायदयाची त्वरित अंमलबजावणी करावी या मागणीसाठी महाराष्ट्रातील पत्रकार २५ नोव्हेंबर रोजी आझाद मैदानावर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहेत.. या आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून येत्या ११ ऑक्टोबर २५ रोजी *एसएमएस पाठवा आंदोलन* केले जाणार आहे.. या दिवशी महाराष्ट्रातील पत्रकार मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना हजारो एसएमएस पाठवून आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधतील.. सर्व प्रमुख पत्रकार संघटनांनी मिळून स्थापन केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाचा वतीने हे आंदोलन करण्यात येत आहे..महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायद्याचे विधेयक २०१७ मध्ये संमत झाले.. त्यानंतर नोव्हेंबर २०१९ मध्ये त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली. ८ डिसेंबर २०१९ मध्ये भारत सरकारच्या गॅझेटमध्ये कायदा प्रसिध्द झाला .. मात्र त्याच्या अंमलबजावणीबीबतचे नोटिफिकेशन राज्य सरकारने न काढल्याने हा कायदा अंमलात आला नाही.. सरकारने तातडीने नोटिफिकेशन काढावे यासाठी विविध पत्रकार संघटना पाठपुरावा करत असताना देखील कायदा अजून अस्तित्वात आला नाही.. अखेर सर्व संघटनांनी एकत्र येत २५ नोव्हेंबरला लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला.. ११ ऑक्टोबर चे आंदोलन हे २५ नोव्हेंबरच्या आंदोलनाचा पहिला टप्पा आहे..पत्रकारांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नसल्याने राज्यात पत्रकारांवरील हल्ले मोठ्या संख्येने वाढले आहेत.. अलिकडच्या काळात नाशिक, मुंबई, अमरावती, करमाळा येथे पत्रकारांवर हल्ले झालेत.. हल्लेखोरांवर जुजबी कारवाई झाल्याने ते मोकाट आहेत.. पत्रकारांना धमक्या देण्याचे प्रमाणही सातत्याने वाढत आहे... हे सर्व वास्तव मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देण्यासाठी, आणि पत्रकारांच्या संतप्त भावना त्यांच्या कानावर घालण्यासाठी *एसएमएस पाठवा आंदोलन* केले जात आहे.. महाराष्ट्रातून लाखो एस एमएस मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना जातील अशी अपेक्षा आहे. एसएमएस आंदोलनात राज्यातील पत्रकारांनी सहभागी होऊन आपल्या संतप्त भावना मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालाव्यात असे आवाहन पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्यावतीने सहभागी संघटना मराठी पत्रकार परिषद, मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई प्रेस क्लब, मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, बृहन्मुंबई यूनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ, मुंबई क्राइम रिपोर्टर असोसिएशन,पुणे पत्रकार प्रतिष्ठान, पुणे श्रमिक पत्रकार संघ, मुंबई हिंदी पत्रकार संघ, नॅशनल यूनियन जर्नालिस्ट ऑफ इंडिया, महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ, जर्नालिस्ट यूनियन ऑफ महाराष्ट्र, डिजिटल मिडिया परिषद,बीयूजे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांनी केले आहे...



# मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा छत्रपती संभाजीनगर येथे विराट हंबरडा मोर्चा : विनायक मुळे

वडवणी:प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दि. ११/१०/२०१५ रोजी,ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकरी बांधवांना सरसकट हेक्टरी ₹५०,००० ची तात्काळ मदत मिळावी या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी बांधवांचा विराट हंबरडा मोर्चा निघणार असल्याने तमाम शेतकरी बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनी केले आहे.

या बाबत अधिक वृत्त असे की,छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दि. ११/१०/२०१५ रोजी,ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकरी बांधवांना सरसकट हेक्टरी ₹५०,००० ची तात्काळ मदत मिळावी या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी बांधवांचा विराट हंबरडा मोर्चा निघणार या मोर्चाच्या पूर्वनियोजनासाठी नुकतीच बीड शहरात निलकमल हॉटेल येथे बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न झाली.बैठकीदरम्यान बीड जिल्हा शिवसेनेचे संपर्क नेते अंबादास दानवे यांनी तालुकानिहाय आढावा घेत मोठ्या संख्येने शेतकरी व पदाधिकारी यांनी हंबरडा मोर्चासाठी संभाजीनगर येथे उपस्थित राहावे असे आवाहन केले. यावेळी बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यामुळे आम्ही सुद्धा मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा छत्रपती संभाजीनगर येथे विराट हंबरडा मोर्चा नियोजन सुरू केले असून या अतिभव्य मोर्चात हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहनही शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यावेळी बीडच्या बैठकीत जिल्ह्यातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, विधानसभा प्रमुख,तालुका प्रमुख, शहर प्रमुख, उप तालुका प्रमुख, तालुका संघटक,गण प्रमुख,गट प्रमुख उपस्थित होते.

# पूरग्रस्तांच्या आयुष्यात नवजीवनाचा किरण... पण हा उपक्रम नेमका कोणाचा?

गेवराई :प्रतिनिधी

मराठवाड्यातील विध्वंसक पुरानंतर हजारो शेतकरी उद्ध्वस्त झाले. घरं, शेती, जनावरे सगळं वाहून गेलं. अशावेळी काही लोकांनी केवळ आश्वासनं दिली; पण एक जण खऱ्या अर्थाने मैदानात उतरला. त्याने शेतकऱ्यांची ''खरी गरज'' ओळखली आणि आर्थिक मदतीच्या पलीकडे जाऊन एक असा उपक्रम उभारला, ज्याने अनेकांच्या आयुष्यात नवजीवन निर्माण केलं.तो उपक्रम म्हणजे ''पशुधन वाटप''!आणि हा संकल्प होता हाजी अरफात शेख यांचा.

राज्य मुस्लिम खाटीक समाजाच्या वतीने, तसेच नव भारतीय शिव वाहतूक संघटना आणि भाजप ट्रान्सपोर्ट सेल चे प्रमुख म्हणून हाजी अरफात शेख यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना जनावरे, अन्नधान्य किट आणि आवश्यक वस्तूंचे वाटप केले. ''शेतकऱ्याला फक्त मदत नको, तर त्याच्या जीवनात नव्या आशेचा किरण हवा,'' असा त्यांचा भावनिक संदेश सर्वांच्या मनाला भिडला.

पूरामुळे हजारो जनावरे वाहून गेली होती. शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर संकट आले होते. अशा परिस्थितीत हाजी अरफात शेख यांनी 'पशुधन वाटप' करून केवळ जनावरं दिली नाहीत, तर शेतकऱ्यांच्या जगण्याला पुन्हा हात दिला. ग्रामस्थांच्या डोळ्यांत अश्रू, चेहऱ्यावर समाधान आणि हाजी अरफात शेख यांना दिलेली ''धन्यवादाची'' सलामी हाच या उपक्रमाचा खरा पुरस्कार ठरला.

या उपक्रमादरम्यान अभिनेते शहजाद खान, मराठवाडा संपर्क प्रमुख जावेद कुरेशी, कार्याध्यक्ष प्रविण आखाडे, सरचिटणीस विनय मोरे आणि वाहतूक संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हाजी अरफात शेख यांनी शेवटी दिलेले शब्द थेट हृदयात उतरले ''मी तुमच्या घरातीलच एक सदस्य आहे. विद्यार्थ्यांसाठी वस्तूंचे वाटप लवकरच करणार आहे.''हा उपक्रम केवळ मदत नव्हे, तर मानवतेचा जिवंत संदेश ठरला.


**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - १) श्रीमती. अलफिया फयाज कुरेशी

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. मोहम्मद अस्लम मो. ईस्माईल कुरेशी

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.६६० मिळकत क्र. ११९८ वडवणी येथील आहे.सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ४० फुट एकुण क्षेत्रफळ ७४.३४ चौ.मी., पुर्व - सल्लाउद्दीन कौसर कुरेशी, पश्चिम - नवेद फारुक कुरेशी

दक्षिण - रस्ता, उत्तर - फतरु शेख

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२३/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. राज दत्तात्रय टकले

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- १) श्री. सतीष श्रीमंत देशमुख २) श्री. किरण श्रीमंत देशमुख

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४४६ प्लॉट क्र. ४० वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १३ मी. दक्षिणोत्तर ९.१५मी. एकुण ११८.९५ चो.मी., पूर्व - ३० फुटाचा रस्ता, पश्चिम - प्लॉट क्र.१७७

दक्षिण - प्लॉट क्र. ३९, उत्तर - प्लॅट क्र. ४१

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३०/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. एकनाथ चत्रभुज शेळके

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- १) श्री. प्रकाश विठ्ठलराव तिडके २) श्री. हमीद नन्हुमियाँ शेख ३) श्री. ज्ञानेश्वर वैजनाथ रोकडे ४) श्री. जकीउद्दीन निजामुद्दीन मोमीन ५) श्री. संदिप गंगाधर आदमाने ६) श्री. मधुकर साहेबराव मोटे ७) श्री. सय्यद जुलफेकार अली कादर अली

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.६५७ प्लॉट क्र.१२ वडवणी येथील आहे., सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ०९ मी. दक्षिणोत्तर १२ मी. एकुण क्षेत्रफळ १०८ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र.११, पश्चिम - प्लॉट क्र.१३

दक्षिण - प्लॉट क्र.०५, उत्तर - ०९ मीटर रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२३/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमती. संजिवनी संजय कवचट

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. संतोष गंपु पवार

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४२५ प्लॉट क्र. ०१ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ८.७५ मी. दक्षिणोत्तर ९.१४ मी. एकुण क्षेत्रफळ ७९.९७ चौ.मी.

पुर्व - डिगे यांची प्लॉटींग, पश्चिम - २५ फुट रस्ता

दक्षिण - खुली जागा, उत्तर - प्लॉट क्र

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२३/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमी. रुमा रामेंद्र कवचट

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. संतोष गंपु पवार

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४२५ प्लॉट क्र.०४ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ८.७५ मी. दक्षिणोत्तर ७.६२ मी. एकुण क्षेत्रफळ ६६.६७ चौ.मी.

पुर्व - डिगे यांची प्लॉटींग, पश्चिम - २५ फुट रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र. ०३, उत्तर - प्लॉट क्र. ०५

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२३/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. बाळासाहेब पि. आबासाहेब चव्हाण

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. अमोल पि. दिनकर आंधळे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४७८ प्लॉट क्र. ०२ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर १२.५० मी. एकुण क्षेत्रफळ १५० चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ०१, पश्चिम - प्लॉट क्र.०३

दक्षिण - ०९ मीटरचा रस्ता, उत्तर - ३० मीटरचा रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**


**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२३/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. बाळासाहेब पि. आबासाहेब चव्हाण

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. अमोल पि. दिनकर आंधळे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४७८ प्लॉट क्र. ०२ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर १२.५० मी. एकुण क्षेत्रफळ १५० चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ०१,पश्चिम - प्लॉट क्र.०३

दक्षिण - ०९ मीटरचा रस्ता, उत्तर - ३० मीटरचा रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**


**जा.क्र.उमप्रवि/लेखा शाखा-२/३६६५/ सह** **दिनांक :- ०७/१०/२५**

**परिशिष्ट-३**

**(ई- निविदेसाठी जाहिरात नमुना)**

**महाराष्ट्र शासन**

ई-मेल- ee_ompdosbad@rediffmail.com

दूरध्वनीक्रमांक - (थेट) (०२४७२) २२२२९३, कार्यालय २२२२९३

**ई- निविदा सूचना क्र. १** **सन- २०२५-२६**

संदर्भ :- कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्रक. मकृखोविम/३७/(३१३/२०२५)/ उअ-३/५१६१/२०२५ दि.२५/०७/२०२५.

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग धाराशिव. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ :https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग, धााराशिव. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास : https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाचे नाव :- सिना मेहकरी उपसा सिंचन योजना ता. आष्टी जि.बिड अंतर्गत येथील पोहोच रस्त्याचे काम व ईतर अंनुषंगीक कामे दुरुस्ती भराव करणे. खडीकरण करणे.

जिल्हा - बीड.

निविदेची किंमत रुपये :- रु.११.१६ लक्ष

ई-निविदा उपलब्ध कालावधी दिनांक ०९/१०/२०२५ ते दिनांक १६/१०/२०२५

ई-निविदा उघडण्याचा दिनांक - १७/१०/२०२५

कार्यकारी अभियंता,
धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग,
धाराशिव.

जिमाका / बी/ जाहि/ २०२५-२६/८९


जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र २४७ /मोप्र-१, दिनांक-१८/१०/२०२३

**महाराष्ट्र शासन**

**(जलसंपदा विभाग)**

कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.३, बीड

**ई- निविदा प्रणाली सुचना क्रमांक ब-१/०२सन: २०२५-२६**

**कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.३ बीड, यांच्याकडून सार्जनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांच्या कडे नोंदनीकृत संस्था कडुन ऑनलाईन पध्दतीने ब-१ ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदेची सविस्तर माहिती व निविदा भरण्या करता www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०८/१०/२०२५ सकाळी-११.०० पासुन ते दिनांक १५/१०/२०२५ दुपारी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.**


**कामाचा तपशिल खालील प्रमाणे**


| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा किंमत (रुपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | को-या नविदा ची किंमत (रुपये) | प्रारंभिक सुरक्षा अनामत (रुपये) | नोदंणीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Carrying out irrigation management work Controlling of Dy/lift & measurement of area in Rabbi & HW season 1 2025-26 by private agency in juridiction of Jayakwadi Irrigation Subdivision No.2, Bagpimpalgaon | २०,८६,७००/- | २०९००/- | १० महिने | २०००/- + ३६० GST | २०९००/- | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| २ | Carrying out irrigation management work Controlling of Dy/lift & measurement of area in Rabbi & HW season 2025-26 by private agency in juridiction of JIPDC Subdivsion No.11 Kesapuri | १९,८२,२१७/- | १९९००/- | १० महिने | २०००/- + ३६० GST | १९९००/- | मजूर सहकारी संस्था |
| | Carrying out irrigation management work Controlling of main canal PRBC & measurement of area in Rabbi & HW season for the year 2025-26 by private agency in juridiction of Jayakwadi Irrigation Subdivision No.4.Gevrai | २२,७८,०१६/- | २२८००/- | १० महिने | २०००/- + ३६० GST | २२८००/- | खुला |

**कार्यकारी अभियंता,**
**जायकवाडी पाटबंधारे विभाग**
**क्र.३, बीड**

संमा/छत्रपती संभाजीनगर /जाहिरात/ १४५/२०२५-२६

साप्ताहिक
डोंगरचा राजा
गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५ । पान ४







# भैय्यासाहेबांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्षपदाची निवडणूक लढविणार-नगरसेवक सचिन सानप

डोंगरचा राजा विशेष वृत्त..

नगरसेवक सचिन सानप म्हणजे तरुणाईमध्ये क्रेझ निर्माण करणारे एक युवा नेतृत्व. आजचा तरुण केवळ स्वप्न पाहत नाही. तर ते साकार करण्याची जिद्द,धाडस आणि दिशा घेऊन पुढे जातोय. युवकांच्या हातात असलेले नेतृत्व म्हणजे फक्त भविष्यासाठी चे आशा नाही. तर वर्तमानात ही परिवर्तन घडवण्याची ताकद आहे. शिस्त सजगता आणि समाजहिताचा दृष्टिकोन असलेले युवा नेतेच खऱ्या अर्थाने नवे भारत निर्माते आहेत. हे आज आवर्जून सांगावसं वाटतं. आज गरज आहे. त्या तरुण नेतृत्वाची. जो शहरात तालुक्यात, जिल्ह्यात,राज्यात आणि देशात विकासाची नवीन पहाट दाखवेल. म्हणूनच तरुणांच्या गळ्यातील ताईत नगरसेवक सचिन सानप हे नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेत. परिवर्तनाची नवी मशाल तरुणाईचं बळ म्हणून ओळखले जाणारे नगरसेवक सचिन सानप हे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांचा आशीर्वादाने व युवकांचे प्रेरणास्थान जयसिंग भैय्या सोळंके यांच्या नेतृत्वाखाली सर्व ताकदीनिशी मैदानात उतरण्यासाठी सज्ज झाले आहेत.

खरंतर वडवणी नगरपंचायत च्या प्रभाग क्रमांक.. मध्ये नगरसेवक सचिन सानप यांनी ज्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या निश्चितच त्यांच्या कार्याची पावती म्हणावी लागेल. प्रभागात असलेल्या नागरिकांच्या सुखदुःखात त्याचबरोबर अडीअडचणीच्या काळात मदतीला धावून जाणार एक उमद तरुण नेतृत्व म्हणून नगरसेवक सचिन सानप यांच्याकडे पाहिलं जातं. आपल्या प्रभागात नागरिकांना काय अडचणी आहेत. त्या कशा सोडवल्या जातील. याला प्रथम प्राधान्य देत विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके आशीर्वादाने व युवकांचे नेतृत्व जयसिंग भैया सोळंके यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करत असल्याचे दिसून आले आहे.



वार्ड क्रमांक.. मध्ये अंडरग्राउंड नाली, सिमेंट रस्ते, पाण्याची सुविधा, लाईटची व्यवस्था या पलीकडे जाऊन आणखी काही करावं लागलं तर ते स्वखर्चाने करण्याच्या तयारीत असतात. खरंतर त्यांनी या प्रभागात अंडरग्राउंड नाली, सिमेंट रस्ते, पाण्याची सुविधा, लाईटची व्यवस्था या पूर्णपणे केल्या आहेत. त्याचबरोबर तरुणाईच्या पसंतीचे सामाजिक उपक्रमही हाती घेऊन आपल्या वार्डात धार्मिक कार्यक्रम घेण्यासाठी सुध्दा ते सदैव तत्पर राहतात. मग त्यामध्ये गणेश उत्सव,नवरात्र उत्सव या सह आदी कार्यक्रम राबविण्यात ते अग्रेसर असतात. त्यामुळे युवकांबरोबरच शहरांमध्ये आता जनमानसात नगरसेवक सचिन सानप यांची एक वेगळी ओळख निर्माण झाली असून तरुणाच्या हाती शहरातील त्याची चावी देण्याचा हालचालींना वेग आला आहे.म्हणजेच नगराध्यक्ष पदाचे आरक्षण नुकतेच जाहीर करण्यात आले आहे.वडवणी नगरपंचायत च्या नगराध्यक्ष पदासाठी ओबीसी महिला राखीव झाल्याने आता अनेक इच्छुक समोर येत आहेत.मात्र आपण वर उल्लेख केल्याप्रमाणे जनमानसात लोकप्रिय असलेले, तरुणाईच्या पसंतीचे तसेच सामाजिक धार्मिक शैक्षणिक उपक्रमातही सहभाग नोंदवून सर्वांना आपलसं करणारे युवकांमध्ये एक वेगळी ओळख क्रेझ निर्माण करणारे सध्या नगरपंचायत चे नगरसेवक म्हणून समाजसेवकाची भुमिका बजावणारे नगरसेवक सचिन सानप हे एकमेव नाव सध्या चर्चेत आहे. या युवक नेतृत्वाने राजकारणातील चढ उतार अगदी जवळून पाहिले आहेत. म्हणुनच विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांचा आशीर्वाद घेऊन माजलगाव विधानसभा मतदारसंघातील युवकांच्या गळ्यातील ताईत असणारे जयसिंग भैय्यासाहेब सोळंके यांच्या नेतृत्वाखाली आपण नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविणार असल्याचे मत नगरसेवक सचिन सानप यांनी डोंगरचा राजा जवळ बोलुन दाखवले.

## सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा छोटासा प्रयत्नः एस.एम.देशमुख

बीड :प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आणि तलावातील पाणी सोडल्याने अनेक गावांचे मोठे नुकसान झाले. याबरोबर गोदाकाठ आणि सिंदफणा काठावरील शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झालेले आहे. अनेकांची घरे वाहून गेली. अनेकांची घरे पडली. शेतकऱ्यांची शेती निस्तनाबूत झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आला.



माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, डेपेगाव, सांडस चिंचोली, आळसे वाडी, गंगामसला या ठिकाणी परिषदेच्या वतीने वतीने ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त देशमुख म्हणाले की पत्रकार हा समाजाचा घटक असतो आणि सामाजिक बांधिलकी म्हणून आमच्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.यावेळी बोलताना एस.एम.देशमुख म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. मराठवाडा आणि सोलापूर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सोलापूर आणि मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये शक्य होईल तेवढी मदत देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील या पाच गावांना ब्लँकेट चे वाटप करण्यात येत आहे. परिषदेच्या वतीने पत्रकारांचे प्रश्न तर सोडवण्यासाठी संघर्ष केला जातोच त्याबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडियाचे राज्याचे अध्यक्ष अनिल वाघमारे, माजलगाव तालुका अध्यक्ष हरीश यादव, पत्रकार पांडुरंग उगले, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष सुहास बोराडे, धम्मपाल डावरे या पत्रकारांसह गावातील सरपंच, चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वैभव फॅशन वधू-वर वस्त्र दालनाचा आज भव्य शुभारंभ

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी शहरात आपल्या सेवेत नवीन में.जी.एल.माळवदे यांचे वैभव फॅशन वधू - वर वस्त्र दालन शोरूमचा आज भव्य शुभारंभ शांती ब्रह्म महंत श्री. हभप नवनाथ बाबा महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या शुभ हस्ते आज संपन्न होत असुन या प्रसंगी आपण सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन नगरसेवक गुरुप्रसाद माळवदे तसेच वल्लभप्रसाद माळवदे व माळवदे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की,वडवणी शहरात नव्याने में.जी.एल.माळवदे यांचे वैभव फॅशन वधू - वर वस्त्र दालन शोरूमचा शुभारंभ आज गुरुवार दिनांक ०९/१०/२०२५ रोजी सकाळी १०:०५ वाजता करण्याचे योजिले आहे. या दालनाचा शुभारंभ शांती ब्रह्म महंत श्री. हभप नवनाथ बाबा महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या शुभ हस्ते व हभप नवनाथ महाराज चिनके तसेच जिल्हा परिषदेचे माजी सभापती जयसिंग भैय्या सोळंके, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,उद्योजक जगदीश नाथानी, तसेच सर्व नगरसेवक, पत्रकार बांधव, व्यापारी, ग्राहक व मित्र परिवाराच्या उपस्थितीमध्ये हा शुभारंभ आज संपन्न होत आहे. तरी आपण शुभारंभास शुभ आशिर्वाद देण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहनही नगरसेवक गुरुप्रसाद माळवदे तसेच वल्लभप्रसाद माळवदे व माळवदे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.










हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)